पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिति

**कार्यपत्रिका क्रमांक – २२**

सभावृत्तांत

**दिनांक - १५/०७/२०१५** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१५/०७/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा. आर.एस.कुमार
३) मा. नेटके सुमन राजेंद्र
४) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
५) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.दंडवते – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.रत्नपारखी – प्र.कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) मौजे रावेत येथील स.नं.९२ मधील २४.०० मी. रस्त्याच्या आखणीमध्ये बदल करणेबाबत – मा.आशा सुर्यवंशी, मा.सुमन नेटके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) दत्तात्रय मरळ गार्डन प्रभाग क्र.२० मध्ये अभ्यासिका बांधणेबाबत – मा.सुमन नेटके, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड शहरामध्ये दोन रक्तपेढया कार्यान्वित करणेबाबत – मा.अश्विनी चिंचवडे, मा.सुमन नेटके यांचा प्रस्ताव.

**-----**

ठराव क्रमांक – ५२ विषय क्रमांक – १

दिनांक – १५/०७/२०१५ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक – मा.सुमन नेटके

संदर्भ – मा.प्रशासन अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/०४/कावि/२७३/ २०१५, दिनांक – ०९/०७/२०१५

ई प्रभाग समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ०१/०७/२०१५ नुसार प्रभाग क्रमांक ३३ मधील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे. प्रभागामध्ये इतरत्र जागा उपलब्ध नसल्यामुळे सर्व्हे नं.२०० मधील आरक्षण क्रमांक ४०७ खेळाचे मैदान मधील सुमारे १५ गुंठे जागा पाण्याच्या टाकीसाठी देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ५३ विषय क्रमांक – २

दिनांक – १५/०७/२०१५

सुचक – मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक – मा.सुमन नेटके

संदर्भ – मा.आशा सुर्यवंशी, मा.सुमन नेटके यांचा प्रस्ताव –

मौजे रावेत येथील स.नं.९२ ही मिळकत श्रीमती कमळाबाई महादू भोंडवे व इतर ८ जण यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर मिळकत रेल्वेलाईनकडे (गायरानकडे) जाणा-या २४.०० मी.रस्ता, औंध-रावेत ३०.०० मी. रस्ता व म.प्रा.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित ४५.०० मी.रस्ता या प्रस्तावाने बाधित होत आहे. उपरोक्त स.नं.९२ मधील औंध-रावेत ३०.०० मी. रस्त्याने बाधीत काही क्षेत्राचा भूसंपादन कायद्याने ताबा मिळकतधारकांनी दिलेला आहे. तसेच प्रस्तावित ४५.०० मी. रस्त्याने बाधीत क्षेत्राचा ताबा ही मिळकतधारक मनपास देणेस तयार आहेत. तसेच २४.०० मी. रस्त्यानेही सदर मिळकती मधील ब-याच प्रमाणात क्षेत्र बाधित होत आहे. त्यामुळे एकाच कुटूंबातील क्षेत्र उपरोक्त रस्त्यांच्या आखणीमुळे बाधीत होत आहे. औंध-रावेत बीआरटी रस्त्यापासून रेल्वेलाईनचे दिशेने सुमारे ३००.०० मी. अंतरावर सदर रस्त्यास पुर्व-पश्चिम १८.०० मी. रस्ता येऊन मिळत आहे. औंध-रावेत बीआरटी रस्ता ते उपरोक्त पुर्व-पश्चिम १८.०० मी. रस्ता या अंतरापर्यंत सदर रस्त्याची रुंदी २४.०० मी.ऐवजी २०.०० मी. केल्यास स.नं.९२ मधील बाधीत क्षेत्र थोडया प्रमाणात कमी होईल व एकाच कुटूंबाचे होणारे नुकसान काही प्रमाणात कमी होईल. तरी औंध-रावेत बीआरटी रस्ता ते पुर्व-पश्चिम १८.०० मी. रस्ता यामधील अंतरामध्ये उपरोक्त

२४.०० मी. रस्त्याची रुंदी पश्चिमेकडील बाजूचे स.नं.९२ मधील कमी करुन २०.०० मी. करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४ विषय क्रमांक – ३

दिनांक – १५/०७/२०१५

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ – मा.सुमन नेटके, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्रमांक २० मध्ये दत्तात्रय मरळ गार्डन मध्ये श्री गणेश व्यायामशाळा बांधलेली आहे. तरी त्या व्यायामशाळेच्या वरच्या स्लॅबवर नागरिकांच्या मागणीनुसार अभ्यासिका बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५५ विषय क्रमांक – ४

दिनांक – १५/०७/२०१५

सुचक – मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक – मा.सुमन नेटके

संदर्भ – मा. अश्विनी चिंचवडे, मा.सुमन नेटके यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या व वाढते शहरीकरण तसेच शहरामधील अनेक हॉस्पिटल्स व रुग्णाकरीता रक्ताची व रक्तघटकाची गरज लक्षात घेता रुग्णांना रक्ताची गरज भासल्यास खाजगी रक्तपेढी अथवा पुण्यामध्ये जावे लागते. त्यामुळे बहुसंख्य नागरिकांच्या मागणीस अनुसरुन पिंपरी चिंचवड शहरामध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातून किमान दोन तरी रक्तपेढया आवश्यक आहेत. १९९१ साली सुरु केलेली तालेरा रुग्णालयातील क्रांतीवीर चापेकर बंधू रक्तपेढी ही पुन्हा कार्यान्वीत करावी व नव्याने सुरु झालेली वाय.सी.एम.रुग्णालयातील रक्तपेढी गोरगरीब रुग्णांसाठी सुरु रहावी. अशा प्रकारे क्रांतीवीर चापेकर बंधू रक्तपेढी तालेरा हॉस्पिटल चिंचवड येथे व यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय, संत तुकारामनगर येथे अशा दोन ठिकाणी रक्तपेढी कार्यान्वीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **छाया जगन्नाथ साबळे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५४२/२०१५
दिनांक : १६/०७/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Shahar Sudharana-14-15\proceeding 22_Shahar Sudharna.doc